मंत्रालयीन सेवा
जनहिताय सर्वदा

सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**

**ग्राम विकास विभाग**

**बांधकाम भवन, २५ मर्झबान पथ, मुंबई -४०० ००१.**

**दूरध्वनी क्र. ०२२-२२८३९९२४** **ई मेल: sopr२.rdd-mh@nic.in**


क्रमांक: ग्रापंनि-२०२५/प्र.क्र.१३/पं.रा.-२ दिनांक: ०७ जुलै, २०२५

प्रति,

जिल्हाधिकारी (सर्व)
(बृहन्मुंबई आणि मुंबई उपनगर वगळून)

विषयः- सरपंच आरक्षण निश्चित करण्याबाबत.

संदर्भ:- (१) महाराष्ट्र शासन राजपत्र, असाधारण भाग चार-ब, क्र. ग्रापंनि-२०२५/प्र.क्र.१३/पं.रा.२, दिनांक ०५ मार्च, २०२५

(२) महाराष्ट्र शासन राजपत्र, असाधारण भाग चार-ब, क्र.ग्रापंनि-२०२५/प्र.क्र.१३/पं.रा.२, दिनांक १३ जून, २०२५

(३) शासनाचे समक्रमांकाचे दिनांक १६ जून, २०२५ चे पत्र.

(४) जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती यांचेकडील क्र. कक्ष-८/अका/ग्रापंनि/कांवी/८२/२०२५, दिनांक १७ जून, २०२५ चे पत्र.

महोदय/महोदया,

सरपंच आरक्षण निश्चित करण्याबाबत संदर्भाधीन क्रमांक १ अन्वये प्रसिध्द करण्यात आलेली अधिसूचना अधिक्रमित करुन संदर्भाधीन क्रमांक २ अन्वये नव्याने अधिसूचना प्रसिध्द करण्यात आलेली आहे. त्यानुसार संदर्भ क्रमांक ३ येथील पत्रान्वये जिल्हा स्तरावर सरपंच आरक्षण सुनिश्चित करण्याबाबत कळविण्यात आले होते.

२. तथापि, काही जिल्हाधिकारी कार्यालयांकडून उक्त नमूद दोन्ही अधिसूचनांन्वये सुनिश्चित करण्यात आलेल्या आरक्षणामध्ये बदल होत नसल्याने पुन्हा आरक्षणाची प्रक्रिया पूर्ण करणे आवश्यक आहे किंवा कसे याबाबत विचारणा होत आहे. यास्तव, कळविण्यात येते की, संदर्भाधीन क्रमांक १ अन्वये प्रसिध्द केलेली अधिसूचना अधिक्रमित करण्यात आलेली

असल्याने, संदर्भाधीन क्रमांक २ येथील अधिसूचनेनुसार सरपंच आरक्षणामध्ये कोणताही बदल होत नसला तरी नव्याने सरपंच आरक्षण सुनिश्चित करणे क्रमप्राप्त आहे. त्यानुसार नव्याने सरपंच आरक्षणाबाबत कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीबाबतचा अहवाल शासनास सादर करावा, ही विनंती.

(बा. म. आसोले)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत:- माहितीसाठी अग्रेषित:
उपायुक्त, राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र
प्रत:- पं.रा.२ कार्यासन, संग्रहार्थ.